खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## प्रथम वर्ष वाणिज्य

## सत्र १

## विषय

## सहकार: सिद्धांत आणि कार्यपद्धती

## प्रकरण 2

# भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास

# प्रकरण 2
# भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास

**प्रस्तावना –**

खेडेगावातील कर्जबाजारी असणारा शेतकरी व त्याची सावकाराकडून होणारी पिळवणूक यामुळे भारतात सहकारी चळवळीचा उगम झाला. भारतात तत्कालीन मुंबई प्रांतातील बडोदे येथे सन १८८९ साली 'अनोन्य सहकारी संस्था' हि पहिली सहकारी संस्था स्थापन झाली.भारतामध्ये १८९५ साली सर फ्रेडरिक निकोलसन यांनी भारतात सर्वप्रथम सहकारी पतपेढ्यांचा पुरस्कार केला . भारतात १९०४ साली पहिला सहकारी कायदा संमत झाला. १९०४ च्या कायद्याच्या उणीव दूर करण्यासाठी नवीन कायदा संमत करण्याची गरज भासली त्यानुसार सरकारने १९१२ मध्ये दुसरा कायदा सहकारी कायदा संमत केला.

## स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील भारतातील सहकाराचा विकास

**प्रस्तावना :**

'विनासहकार नाही उद्धार', 'सर्वांसाठी एक व एकासाठी सर्व' हे सहकाराचे घोषवाक्य आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतात सहकार चळवळीचा जो विकास झाला त्याचे १९०४ हे साल आधार वर्ष मानण्यात आलेले असून भारतातील सहकार चळवळीच्या विकासाचे १९०४ ते १९११, १९१२ ते १९१८, १९१९ ते १९२९, १९३० ते १९३९ व १९३९ ते १९४६ असे पाच टप्पे मानण्यात येतात. भारतातील सहकार चळवळीच्या विकासाचे टप्पे पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येतील

**१) १९०४ ते १९११ प्राथमिक अवस्था :**

१९०४ च्या पतसंस्था कायद्यामुळे भारतातील सहकार चळवळीला चालना मिळाली. या कायद्यामुळे भारताच्या ब्रिटिश भागात नवीन संस्था स्थापन करण्यात आल्या. १९०५ साली मद्रास येथे 'ट्रिप्लीकेन अर्बन को. सोसायटी' स्थापन करण्यात आली. तसेच मद्रास येथेच सेंट्रल अर्बन बँकेची स्थापना करण्यात आली. १९०७ साली मध्य प्रांतात क्रॉस्थवेट सेंट्रल कॉ. बँक स्थापन करण्यात आली. १९११ साली मुंबई येथे मेघवाल को-ऑप. क्रेडिट सोसायटी स्थापन करण्यात आली. याच काळात जालंधर जिल्ह्यातील शंकरपट्टी या गावात ठाकर कृषी सहकारी पतसंस्था स्थापण्यात आली.

**२) १९१२ ते १९१८ वेगवान विकासाची अवस्था :**

सहकारी पतसंस्था कायदा, १९०४ च्या मर्यादा व उणिवा स्पष्ट झाल्याने व्यापक कायद्याची आवश्यकता निर्माण झाली. १९१२ ते १९१८ या कालावधीत भारतात सहकार चळवळीचा जो विकास झाला त्यामुळे १९०४ चा कायदा अपूर्ण वाटू लागला. कारण या कायद्यात पतसंस्था वगळता अन्य सहकारी संस्थांची नोंदणी करण्याची तरतूद नव्हती. सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्रही मर्यादित ठेवण्यावर भर देण्यात आला होता. १९०४ च्या कायद्यामध्ये बिगर पतसंस्था स्थापन करण्याची कोणतीही तरतूद नव्हती. म्हणून भारत सरकारने १९१२ साली व्यापक मध्यवर्ती सहकारी कायदा संमत केला.

**३) मॅक्लेगन समितीचे कार्य :**

भारतीय सहकार चळवळीच्या इतिहासात मॅक्लेगन समितीचे कार्य वैशिष्ट्यपूर्ण मानले जाते. १९१४ साली केंद्र शासनाने एडवर्ड मॅक्लेगन यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील सहकारी चळवळीची प्रगती व उणिवा अभ्यासण्यासाठी एक समिती स्थापन केली. १९१५ साली एडवर्ड मॅक्लेगन यांनी आपला अहवाल शासनाला सादर केला. सहकारी चळवळीच्या भविष्याच्या दृष्टीने काही मौलिक सूचना केल्या. परिणामी, सहकारी संस्थांच्या कार्यात पारदर्शकता आली.

**४) १९१९ ते १९२९ अनियोजित विकासाची अवस्था :**

ब्रिटिशांनी भारतामध्ये मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायदा लागू करण्याचा निर्णय घेऊन १९१९ साली एक घटना सुधारणा कायदा तयार केला. या कायद्यान्वये 'सहकार' हा प्रांतीय विषय ठरला. सहकार प्रांतीय विषय ठरल्याने प्रत्येक प्रांताने सहकार चळवळीकडे अधिक आत्मियतेने लक्ष देण्यास सुरुवात केली. परिणामी, या कालखंडात सहकार चळवळीचा विकास जलद गतीने झाला. मात्र हा विकास अनियोजित होता. सहकार हा प्रांतीय विषय झाल्याने १९१२ साली संमत करण्यात आलेला कायदा निरुपयोगी ठरला.इ.स. १९२५ साली मुंबई प्रांताने सर्वप्रथम प्रांतीय कायदा संमत केला.

**५) १९३० ते १९३९ पुनर्रचनेचा काळ :**

भारतीय सहकार चळवळीच्या इतिहासात १९३० ते १९३९ हा कालखंड पुनर्रचनेचा कालखंड असल्याचे मानले जाते. १९२९-३० च्या जागतिक महामंदीमुळे भारतातील सहकार चळवळीची पिछेहाट झाली. जागतिक महामंदीची झळ भारतीय अर्थव्यवस्थेला विशेषतः शेतकऱ्यांना बसली. १९२९ साली सहकारी संस्थांची संख्या ८८ हजार होती. ती १९३९ पर्यंत १२२ हजारापर्यंत वाढली.

म्हणजे या नऊ वर्षाच्या कालखंडात ३४ हजार सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. या कालखंडाची महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे केंद्रीय बँकिंग आयोगाने सुचविलेल्या शिफारशीनुसार भारत सरकारने १९३४ साली रिझर्व्ह बँकेची स्थापना करण्याचा कायदा संमत केला व १९३५ साली रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. या दोन घटनांमुळे भारतीय सहकार चळवळीस चालना मिळाली.

६) १९३९ ते १९४६ पुनर्विकासाची अवस्था :

१९३९ ते १९४६ हा कालखंड भारतीय सहकार चळवळीच्या विकासाचा अतिशय महत्त्वाचा कालखंड मानला जातो. आधीच्या कालखंडात सहकारी चळवळीची झालेली पिछेहाट, विस्कटलेली घडी सुधारण्याच्या उद्देशाने या कालखंडात विशेष प्रयत्न करण्यात आले. शाही कृषी आयोग आणि केंद्रीय बँकिग चौकशी आयोगाने सुचविलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली. परिणामी सहकारी चळवळीला आलेली मरगळ पूर्णपणे दूर झाली. अर्थव्यवस्थेत तेजी निर्माण झाल्याने शेतमालाच्या किमती वाढल्या. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली.

## “सर फ्रेडरिक निकोलसन यांचा १९०४ चा अहवाल”

१९ व्या शतकात शेती ही पूर्णपणे निसर्गावर अवलंबून होती आणि शेतीची उत्पादकता अत्यंत कमी होती. या शतकाने १८६१, १८६६, १८७३ चे दुष्काळ पाहिले. या दुष्काळामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय बनली होती. महाजन आणि सावकार खूप व्याजदराने शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करत असत. या परिस्थितीत शेतकरी आक्रमक बनले. १८७५ मध्ये त्यांनी पुणे आणि अहमदनगर येथील सावकारांवर हल्ले चढविले. ब्रिटिश सरकारने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अनेक पावले उचलली; परंतु परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. १८९२ मध्ये मद्रास प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड बेनलॉक यांनी त्यावेळचे मद्रासचे जिल्हाधिकारी (कलेक्टर) श्री. फ्रेडरिक निकोलसन यांना युरोप खंडातील सहकार चळवळीचा अभ्यास करण्यासाठी पाठविले. त्यांनी तेथील परिस्थितीचा अभ्यास करून १९०४ मध्ये आपला अहवाल सादर केला. या अहवालात त्यांनी खालील बाबी नमूद केल्या.

१) शेतकऱ्यांना स्वावलंबनाचे व काटकसरीचे धडे देईल आणि त्यांच्या जीवनात नियमितपणा निर्माण करून त्यांना मार्गदर्शन करील अशा संस्थेची आवश्यकता आहे.

२) केवळ स्वस्त दराने कर्ज पुरवठा करणे हा एकच प्रश्न नसून तो ज्या पद्धतीने द्यावयाचा आहे ती पद्धती देखील महत्त्वाची आहे.

३) त्यासाठी परस्पर मदतीच्या तत्त्वावर आधारलेल्या पतपुरवठा संस्था/संघटना स्थापन करण्यात याव्यात.

४) सरकारने किंवा भांडवली बँकांनी अशा संस्था स्थापण्याचे काम हाती घेऊ नये. त्यांनी 'रायफेसन शोधा' या दोन शब्दात आपल्या अहवालाचा समारोप केला आहे. जर्मनीतील श्री. एफ. डब्ल्यू रायफेसन यांनी १८६२ मध्ये जर्मनी येथे जगातील पहिली कृषी पतपुरवठा बँक स्थापन केली. फ्रेडरिक निकोलसन यांच्या रायफेशन शोधा या सल्ल्यामागे जर्मन धर्तीवर कृषी सहकारी पतपुरवठा बँका स्थापन करा असा उद्देश होता. फ्रेडरिक निकोलसन यांच्या अहवालाचा विचार करून मद्रास सरकारने त्यांना प्रायोगिक तत्त्वावर अशा काही बँका स्थापन करण्यास सांगितले. याचा परिणाम प्रेरणादायी ठरला.

## मॅक्लेगन समितीचा १९१२ (१९१४) चा अहवाल

सन १९०४ मध्ये पहिला सहकार कायदा स्थापन करण्यात आला त्यानंतर १९१२ मध्ये दुसरा सहकारी कायदा संमत केला. त्यानंतर भारतातील सहकारी संथांचा विकासाचा आढावा घेण्यासाठी तत्कालीन ब्रिटिश सरकारने सन १९१४ मध्ये सर एडवर्ड मॅक्लेगन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने भारतातील सहकारी क्षेत्राचा अभ्यास करून काही दोष आणि उपाययोजना सुचवल्या त्या खालीलप्रमाणे

### A) मॅक्लेगन समितीने सुचवलेले सहकार क्षेत्रातील दोष

१) अनियोजित आणि अतिशय वेगाने  काहीही विचार न करता घाईगडबडीने सहकारी संस्था स्थापन केल्यामुळे सहकार क्षेत्राची वाढ अव्यवस्थित प्रकारे झाली.
२) सहकारी सभासदांना सहकारी तत्वांबद्दल पुरेशी जाणीव नाही
३) सरकारच्या प्रभावामध्ये येऊन सहकारी संस्था स्थापन झाल्या होत्या म्हणजेच लोकांनी स्वयंप्रेरित होऊन संस्था स्थापन झाल्या नाही.
४) बहुसंख्य सहकारी संस्थांच्या कारभारात निपक्षपाती वृत्तीचा अभाव जाणवतो
५) सहकारी संस्थांमध्ये दुर्बल घटकांना पुरेसे प्रतिनिधित्व दिले गेल्याचे दिसले नाही.
६) सभासदांना व्यवस्थापनाची पुरेशी माहिती नाही म्हणून संस्थेमध्ये गैरव्हवहार आणि गैरव्यवस्थापन होताना दिसते आहे
७) लोकांना बचतीची सवय लावणे व त्यांच्याकडून ठेवी गोळा करून त्यातून पुह्ला कर्जपुरवठा करणे या कार्यात या संस्था अपयशी ठरल्याचे या समितीला आढळून आले.

**B) मॅक्लेगन समितीने सुचवलेल्या उपाययोजना( शिफारसी )**

१) संस्थांचे कार्यक्षेत्र कमी करून एका गावासाठी एकच सहकारी संस्था असावी
२) सहकारी संस्था अधिक कार्यक्षम होण्यासाठी लोकांकडून बचतरूपाने ठेवी गोळा करण्यावर भर द्यावा.
३) सभासदांची जबाबदारी हि मर्यादित स्वरूपाची असावी.
४) सहकारी संस्थांनी उत्पादक कार्यासाठीच कर्जपुरवठा करण्यास प्राधान्य द्यावे.
५) सहकारी संस्थांच्या संरक्षणासाठी व विकासासाठी तरतूद म्हणून संस्थांनी आपल्या नफ्याचा काही भाग बाजूला ठेऊन त्यातून राखीव निधी उभा करावा.
६) सहकारी संस्थांच्या आर्थिक व्यवहारांतील भ्रष्टाचार व गैरव्यवहार दूर व्हावेत या दृष्टिकोनातून या संस्थांनी नियमितपणे हिशेब तपासणी करून घ्यावी.
७) सहकारी चळवळीला चालना देण्यासाठी तसेच नियंत्रण ठेवण्यासाठी एका मुख्य सहकारी बँकेची स्थापना करावी.
८) सहकारी संस्था च्या कार्यक्षेत्रामध्ये ग्राम पातळीवर सहकारी संस्था असाव्या तसेच तालुका पातळीवर संस्थांचा संघ असावा आणि जिल्हा पातळीवर सहकारी बँकेकडून नियंत्रण व्हावे अशी त्रिस्तरीय रचना असावी.
९) प्राथमिक सहकारी संस्थांनी माध्यमिक सहकारी संस्थेचे सभासदत्व स्वीकारावे.
१०) सहकारी संस्थांनी आपल्या सभासदांशीच व्यवहार करावेत.
११) सभासदांना सहकाराचे शिक्षण द्यावे.
१२) संस्थेचा सभासद म्हणून योग्य असाच व प्रामाणिक व्यक्तीची निवड करावी.
अश्या शिफारसी या समितीने केल्या.

## <u>भारतातील सहकारी चळवळीत विविध समर्थकांचे योगदान</u>

१ ) १९५८ चा राष्ट्रीय सहकारी ठराव :

भारत सरकारने समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी सहकार हे माध्यम केले . व १९५४ साली राष्ट्रीय सहकारी ठराव करण्यात आला व विकासाचे माध्यम म्हणून सहकारावर अधिक भर देण्यात आला .

२ ) वैकुंठलाल मेहता समिती :

१९५९ साली वैकुंठलाल मेहता यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी पतपुरवठा समिती नियुक्त करण्यात आली . तारण न पाहता कारण पाहून कर्जपुरवठा करावा अशी महत्वपूर्ण शिफारस या समितीने केली व सेवा सहकारी संस्था अर्थक्षेत्र होण्याच्या दृष्टीने महत्वाच्या उपाययोजना सुचविल्या .

**३ ) डॉ . पी . नटेशन समिती :**

१९६० साली डॉ . पी . नटेशन समिती नेमली गेली . या समितीने ग्राहक सह संस्थांच्या संदर्भात महत्वाच्या शिफारशी केल्या . ग्राहक सह संस्थांची रचना कोणत्या प्रकारची असावी याबाबत निश्चित वर्गीकरणाबाबत भूमिका स्पष्ट केली

**४ ) १९६३ ची श्री.व्ही. एल. मेहता समिती :**

समितीने विविध पातळ्यांवरील सहकारी खात्याच्या रचनेचा आढावा घेवून या समितीने प्रशासन , हिशेबतपासणी ,व सेवेकतंचे प्रशिक्षण याबाबत महत्वाच्या शिफारशी केल्या.

**५ ) १ ९ ६४ ची आर.एन.निधी समिती :**

या समितीने शेतकी सह पतपुरवठा संस्थेने सावकाराला सभासद करू नये , शेतमालाचा व्यवसाय करण्याच्या शिफारस सह खरेदी विक्री संस्थेच्या परिपूर्ण सभासद करून घेवून नये व राष्ट्रीय सहकारी बँकेच्या स्थापनेची शक्यता आजमावून पहावी अशी महत्वपूर्ण शिफारशी केल्या .

**६ ) बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट सहकारी बँकांना लागू :**

मार्च १९६६ मध्ये बँकींग रेग्युलेशन अॅक्ट सहकारी बँकांना लागू करण्यात आला .

**७ ) ए . डी . गोरवाला समिती :**

१९५२ मध्ये आरबीआयने श्री . ए . डी . गोरवाला यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली . या समितीस अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण समिती असे म्हणतात . १९५४ मध्ये आपला अहवाल समितीने सादर केला . ग्रामीण कर्जपुरवठ्यामध्ये सरकारचा सहभाग व विक्रीला प्रकारच्या सहकारी संस्थामध्ये समन्वय प्रस्थापित करण्याची शिफारस समितीने केली . त्यासाठी विविध प्रकारचे निधी उभारावीत अशी शिफारस केली.

**८ ) बी व्यंकट पैया समिती :**

१९६९ साली व्यंकट पैया समितीने अर्थक्षेत्र सहकारी संस्थांची गरज , कर्ज देण्याच्या सोयी व त्वरीत , लवचिक पद्धती याविषयी शिफारशी केल्या .

**९ ) शिवरामन समिती :**

१९७० मध्ये शिवरामन समिती नेमली गेली . या समितीने शेतकऱ्यांना खावटी कर्ज मंजूर करण्याची शिफारस केली .

१० ) सरैय्या समिती :

१९७१ मध्ये श्री आर सी सरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली बँकींग व्यवसायाची अभ्यास करण्यासाठी बँकांना कमिशन नियुक्त करण्यात आले व त्यानुसार २ ऑक्टोंबर १ ९ ७५ रोजी प्रादेशिक ग्रामीण बँका स्थापन करण्यात आल्या आहेत . सहकारी संस्थाबरोबरच त्याचाही शेतकरी उपयोग करतात .

११ ) प्रा. एन. एल . दातवाला समिती:

१९६४ मध्ये सहकार विपननन समिती स्थापन करून या समितीने कृषी उत्पादित मालाची खरेदी , विक्री , उपभोग्य वस्तू विस्तारण आणि उत्पादकांसाठी साधनांचा पुरवठा आणि पतपुरवठा इत्यादी बाबींची कार्यकक्षा अभ्यासून महत्वपूर्ण शिफारशी केल्या . त्यात प्रामुख्याने सहकारी संस्थांनी विस्तारीत चळवळीवर कार्य करावे , राज्य पातळीवरील संस्थांचा शाखा जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आणि प्राथमिक पातळीवर प्राथमिक खरेदी विक्री संस्थांनी कार्य करावे . त्याचप्रमाणे कृषीमाल खरेदी विक्री बरोबरच वितरण आणि पुरवठा कार्य हाती घेण्याविषयी महत्वपूर्ण शिफारशी केल्या.

--------------------------------The End-------------------------------------

**संदर्भ ग्रंथ**

१) डॉ.धीरज झाल्टे व इतर, सहकार: सिद्धांत आणि कार्यपद्धती(२०२०), प्रशांत पब्लिकेशन,जळगाव.
२) प्रा.नंदा लहाडे, सहकार (२०१३), आयडॉल पब्लिकेशन, पुणे.
३) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास क्रम संशोधन मंडळ ,पुणे : सहकार
४) तापकीर मुकुंद व साबळे आर.जे. (२००५), सहकार ,निराली प्रकाशन ,पुणे
५) डॉ. आर के दातीर (२००९) ‘भारतातील बँक व्यवसाय आणि सहकार , निराली प्रकाशन,पुणे
६) जोशी सी जे (१९८६ ), सहकार , फडके प्रकाशन, कोल्हापूर